शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं.२०/२०२५

श्री.सत्यवान रामचद्र जगताप
रा.रोड न ७, क्रांतिसिंह नाना पाटील नगर,
उरण-इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली — तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. राजारामबापु इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी,
राजारामनगर, ता.वाळवा, जि.सांगली.
२. कासेगाव शिक्षण संस्था, कासेगाव,
ता.वाळवा, जि.सांगली. — वि.प.

कासेगाव शिक्षण संस्था, कासेगाव, जि.सांगली या शिक्षण संस्थेचे राजारामबापु इन्सिटटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, ता.वाळवा, जि.सांगली येथील सहयोगी प्राध्यापक श्री.सत्यवान रामचंद्र जगताप यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.११/०६/२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

तक्रारीचे स्वरूप :

१) शिल्लक तीन वर्षाच्या अर्ध्या पगाराच्या रकमेचे न दिले जाणे- मला एआयसीटीई क्यूआयपी (AICTE QIP) योजनेअंतर्गत तीन वर्ष शैक्षणिक वर्ष २०१७-१८ ते २०१९-२० पूर्ण पगारावर पीएच.डी करण्यासाठी sponsor केले होते. ही sponsorship पूर्ण पगारावर (Salary+Allowance) असल्याचे माझ्या पूर्णवेळ पीएच.डी करण्याच्या परवानगीच्या अर्जात आणि संस्थेच्या sponsorship Letter स्पष्टपणे नमूद केले आहे. तथापि, संस्थने वरील तीन वर्षात मला पूर्ण पगार (Salary+Allowance) दिलेला नाही.

२) ७ व्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीस उशीर- संस्थेत ७ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी झाली तेव्हा मला त्यामधून वगळण्यात आले. पीएच.डी पूर्ण होईपर्यंत ७ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी उशिरा करण्यात आली. कृपया हा फरक लवकरात लवकरत मिळावा ही विनंती.

३) माझा महागाई भत्ता (DA) जुलै २०२० पासून stagnant आहे. माझ्या पीएच.डी च्या अपूर्ण स्थितीवर आधारित डीए (DA) stagnant चा निर्णय २०२० मध्ये मला कळविण्यात आला. सहयोगी प्राध्यापक वेतनश्रेणी नियुक्तीपत्र दिनांक ३१ मार्च २०११ नुसार, जोपर्यंत मी सात वर्षात पीएच.डी पूर्ण करणार नाही तोपर्यंत फक्त इन्क्रिमेंटस थांबवायचे होते. म्हणून कृपया DA stagnation चा फरक देखील लवकरात लवकर मिळावा ही विनंती आहे.

२) महाविद्यालयाचा अभिप्राय :

१) जुलै २०१७ ते जूलै २०२० या कालावधीत पीएच.डी साठी डेप्युटेशनवर असताना केवळ मूळ वेतन अदा केले अन्य कोणतेही भत्ते दिले नाहीत या मागणीबाबत-

श्री. सत्यवान रामचंद्र जगताप यांना दि.०१/०४/२०११ रोजी सहयोगी प्राध्यापक केले. या पदाची पात्रता ही पीएच.डी. होती. तथापि श्री. सत्यवान रामचंद्र जगताप हे पीएच.डी. नव्हते व त्यांना कॅम्प अंतर्गत सहायक प्राध्यापक केले गेले. श्री. सत्यवान रामचंद्र जगताप यांनी सहायक प्राध्यापक झाल्यापासून सात वर्षात पीएच.डी. पदवी प्राप्त करणे आवश्यक होते. त्यांनी २०१७ पर्यंत पीएच.डी. प्राप्त करण्याबाबत कोणतीही पावले उचलली नाहीत. तथापि सहायक प्राध्यापकाचे सर्व लाभ घेतले. जेव्हा सात वर्ष पूर्ण होत आली तेव्हा त्यांनी पीएच.डी. करिता हलचाल सुरु केली. त्यांना पीएच.डी. प्राप्त करण्याकरिता कोणतीही सवलत देणे संस्थेवर जबाबदारी नव्हती.

कासेगाव शिक्षण संस्थेचे, राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर ही पूर्णतः विनाअनुदानित आहे. विद्यार्थ्यांकडून मिळणारे शैक्षणिक शुल्क हेच महाविद्यालयाचे उत्पन्न आहे. त्या उत्पन्नात विद्यार्थ्यांना ज्ञानदान व तांत्रिक सोयी पुरवून त्यांना पदवीधर सक्षम करणे ही महाविद्यालयाची जबाबदारी आहे. अशा वेळी त्यांनी त्यांची वैयक्तिक शैक्षणिक पात्रता वाढविण्याकरिता पीएच.डी. करण्याकरिता मान्यता, स्पॉन्सरशिप व सुट्टी देण्याची मागणी केली. त्यावेळी त्यांनी फक्त मूळ पगार द्यावा व नियमानुसार दाखला द्यावा अशी विनंती केली व त्यास अनुसरून त्यांना दि.१४/०७/२०१७ रोजी दि.१५/०७/२०१७ ते ३०/०६/२०२० या कालावधीसाठी दाखला दिला. या काळात त्यांनी महाविद्यालयाकडून कोणतेही शैक्षणिक कामकाज केले नाही व हजर राहिले नाहीत तरीही त्यांना नियमित मूळ पगार दि.३०/०६/२०२० पर्यंत अदा केला. तसेच अदा करताना महाविद्यालयाची कोणतीही कायदेशीर जबाबदारी नव्हती. तथापि, सहानुभूतीने त्यांना मूळ पगार जो एकूण पगाराच्या ५० टक्के पर्यंत होता तो अदा केला. असा पगार त्यांना अदा करत असताना जुलै २०१७ ते जून २०२० या कालावधीत कोणत्याही आक्षेपाविना पगार स्वीकारला व त्यानंतर या बाबत कोणतीही आक्षेप, तक्रार, मागणी एप्रिल २०२४ पर्यंत पीएच.डी. होईपर्यंत केली नाही. त्यांनी पीएच.डी. पूर्ण होत आल्यानंतर दि.०१/०१/२०२४ रोजी एक पत्र दिले व त्यात त्यांच्या मागण्या त्यांनी नमूद केल्या आहेत व त्यामध्ये सुद्धा जुलै २०१७ ते जून २०२० या काळातील तथाकथित फरकाची अनुचित मागणी केली आहे. त्यांच्या मागणीस कोणताही कायदेशीर आधार नाही व तशी महाविद्यालयाची जबाबदारीही नाही.

२) जुलै २०१८ पासून महागाई भत्ता वाढ दिली नाही, तो स्टॅगनंट केला ही मागणी -

जुलै २०१८ ते जुलै २०२० या कालावधीत ते महाविद्यालयामध्ये काम करीत नव्हते. ते वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सांगली येथे पीएच.डी. करीत होते. त्यामुळे महागाई भत्त्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. महाविद्यालयाने श्री. सत्यवान रामचंद्र जगताप यांना च्या पत्राने (जे पत्र श्री.

सत्यवान रामचंद्र जगताप यांनी अ. क्र. ८ ला जोडले आहे व अ. क्र.११ ला दि.११/०१/२०२१ चे पत्र जोडले आहे.) या पत्राने "Please note that as per BOG meeting dated 07/03/2016 in case of non- completion the net increments and Dearness Allowance (D.A.) will become stagnant." असे कळविले होते. त्या पत्रास श्री. सत्यवान रामचंद्र जगताप यांनी काहीही आक्षेप घेतला नाही अगर त्याबाबत हरकत दर्शविली नाही व तसेच दि.११/०१/२०२१ च्या पत्राने महाविद्यालयाने तपशीलवार कळविले होते की, त्यांनी कोणताही आक्षेप न घेता कृतीतून मान्य केले आहे. दि.३०/०७/२०१६ च्या पत्रानुसार महाविद्यालयाने त्यांना पीएच.डी बाबतच्या कामकाजाविषयी रिपोर्ट मागविला. या पत्रास त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच मिळालेल्या वेतनाबाबत आक्षेप घेतला नाही. त्यानंतर पुन्हा त्यांनी दि.११/०१/२०२१ च्या पत्रासोबत महाविद्यालयाचे दि.३०/०७/२०१६ च्या पत्र जोडले आहे. त्यांनी जोडलेल्या त्या पत्रात त्यांच्या पीएच.डी दीर्घ विलंबाबाबत नमूद करून खालील कथन केले आहे. "Please note that as per BOG meeting dated 07/03/2016 in case of non - completion the next increments will become stagnant w-e-f July 2018 and as per BOG meeting dated 03/06/2020 in case of non-completion, Dearness Allowance (D.A.) will become Stagnant w.e.f. July 2020 and after completion of Ph-D- you will not be eligible to get difference of your increments and Dearness Allowance (D.A.)- You will be eligible to get increment from that year and current Dearness Allowance (D.A.) which is applicable to all regular staff-" तरी दि.०६/०४/२०२४ रोजी पीएच.डी पदवी मिळेपर्यंत ज्या गोष्टीस त्यांची हरकत नव्हती, कोणत्याही अटीवर व शर्तीवर आक्षेप न दर्शविता काम केले त्या बाबत पीएच.डी पदवी मिळत आलेवर दि.११/०१/२०२४ च्या पत्राने प्रथमच कथन केले व पश्चात बुध्दीने मागणी केली.

३) सातव्या वेतन आयोगानुसार देय असलेले वेतन अदा केलेले नाही मागणी बाबत -

सातव्या वेतन आयोगाच्या अधिसूचनेत सातव्या वेतन आयोगाकरिता पात्र असताना व्यक्तीची शैक्षणिक पात्रता स्पष्टपणे नमूद होती व तसे स्पष्ट शैक्षणिक पात्रता धारण करणारेच सातव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीस पात्र होते. सातवा वेतन आयोग श्री. सत्यवान रामचंद्र जगताप यांना लागू करताना ते पीएच.डी होणे नियमाने आवश्यक होते व सातवा वेतन आयोग महाविद्यालयाने दिनांक ०१/०७/२०२३ रोजी लागू केला व त्यावेळी श्री. सत्यवान रामचंद्र जगताप यांनी पीएच.डी पदवी प्राप्त केलेली नव्हती. सदर त्यांना नियमाप्रमाणे सातवा वेतन आयोग लागू झाला नाही व त्यांनी पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांना दि.०६/०४/२०२४ पासून सातवा वेतन लागू केला. ते कोणत्याही फरकास पात्र ठरत नाहीत.

सदर त्यांची तक्रार फेटाळण्यात येत आहे व तशी ती करण्यात यावी ही विनंती.

३) समितीची निरिक्षणे :

तक्रारदार श्री. सत्यवान रामचंद्र जगताप हे जाबदार क्र. २ संस्थेच्या अधिपत्याखाली चालविण्यात येणा-या Rajarambapu Institute of Technology येथे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. तक्रारदार यांना एआयसीटीईच्या गुणवत्ता सुधारणा कार्यक्रम (QIP) अंतर्गत पूर्णवेळ पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी दिनांक १५/०७/२०१७ ते ३०/०६/२०२० या कालावधीकरिता प्रायोजीत केले होते.

तक्रारदार यांनी समितीसमोर खालीलप्रमाणे तीन प्रमुख तक्रारी मांडल्या आहेत-

१. पीएच.डी प्रायोजक्त कालावधीत पूर्ण वेतन व लागू भत्ते अदा न करणे,
२. जुलै २०१८ पासून महागाई भत्ता वाढ दिली नाही. तो स्थगित stagnant करण्यात आला.
३. सातवा वेतन आयोग लागू करण्यास विलंब व त्याची थकबाकी न देणे.

जाबदार संस्था व महाविद्यालय यांनी सविस्तर लेखी म्हणणे सादर करून तक्रारीस विरोध दर्शविला आहे. संस्थेच्या म्हणण्यानुसार त्यांनी घेतलेले निर्णय सेवा नियम, संस्थेची नियमक मंडळ (BOG) यांचे ठराव व AICTE लागू असलेले नियमानुसार आहे. तक्रारदार यांना पीएच.डी. पूर्ण करण्यासाठी केवळ सहानुभूतीपोटी मूळ वेतन अदा करण्यात आले असून त्या कालावधीत त्यांनी प्रत्यक्ष महाविद्यालयामध्ये सेवा बजावलेली नव्हती. तसेच तक्रारदार यांनी सहयोगी प्राध्यापक पदोन्नतीनंतर विहित सात वर्षांच्या कालमर्यादेत पीएच.डी. पदवी पूर्ण न केल्यामुळे संस्थेस तक्रारदार यांची वेतनवाढ व महागाई भत्ता स्थगित करण्याचा निर्णय घ्यावा लागला. तसेच तक्रारदार यांनी त्यास संमती दिली होती. तसेच सातवा वेतन आयोगाबाबत संस्थेने पीएच.डी ही अनिवार्य पात्रता असलेने पीएच.डी प्राप्त केलल्या दिनांकापासून त्याचा लाभ तक्रारदार यांना देण्यात आला आहे असेही जाबदार यांचे म्हणणे आहे.

समितीने तक्रार अर्ज, जाबदार यांचे लेखी म्हणणे तसेच दोन्ही पक्षांनी सादर केलेली कागदपत्रे, पत्रव्यवहार तसेच लागू नियमांचे बारकाईने परीक्षण केले व समिती खालीलप्रमाणे निर्णयास आली.

तक्रारदार यांनी दिनांक १४/०६/२०१६ रोजी संस्थेच्या संचालकांना उद्देशून केलेला अर्ज समितीसमोर सादर केला आहे. सदर अर्जामध्ये "पूर्ण वेतन व लागू भत्त्यांसह पीएच.डी. कार्यक्रमासाठी प्रतिनियुक्ती" अशी स्पष्ट मागणी नमूद असल्याचे दिसून येते. यावरून तक्रारदार यांची मूळ विनंती ही पूर्ण वेतनासह प्रतिनियुक्ती देण्याबाबत होती, हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

जाबदार संस्थेने आपल्या म्हणण्यात तक्रारदार यांनी केवळ मूळ वेतनाची मागणी केल्याचा युक्तिवाद केला असला, तरी त्या म्हणण्याच्या समर्थनार्थ कोणताही ठोस लेखी पुरावा समितीसमोर सादर केलेला नाही. उलट, संस्थेने दिलेल्या दि.१४/०७/२०१७ रोजीच्या Relieving Certificate मधून तक्रारदार यांना "Paid Full salary and allowances during the tenure of his sponsorship" स्वरूपाची मान्यता देण्यात आल्याचे कागदपत्रांवरून निदर्शनास येते.

संस्थेने एकदा लेखी आदेशाद्वारे स्वीकारलेल्या अटी नंतर प्रतिकूलपणे नाकारता येत नाहीत. संस्थेच्या स्वतःच्या म्हणण्यानुसार तक्रारदार यांना अदा करण्यात आलेले मूळ वेतन हे त्यांच्या एकूण वेतनाच्या सुमारे ५० टक्के इतके होते. यावरून संस्थेने वेतन देण्याची जबाबदारी मान्य केली होती, हेही स्पष्ट होते.

त्यामुळे समिती या निष्कर्षाप्रत येते की, दिनांक १५/०७/२०१७ ते ३०/०६/२०२० या कालावधीत तक्रारदार व संस्था यांच्यातील मालक-कर्मचारी संबंध अखंडित अस्तित्वात होते. तक्रारदार प्रतिनियुक्तीवर असले तरी ते संस्थेच्या सेवेतून मुक्त झाले नव्हते. परिणामी, त्यांना त्या कालावधीतील उर्वरित वेतन व लागू भत्ते मिळण्याचा वैधानिक व सेवा नियमांनुसार अधिकार प्राप्त होतो.

तक्रारदार यांच्या दुस-या मागणीबाबत, म्हणजे जुलै २०१८ पासून वेतनवाढ व जुलै २०२० पासून महागाई भत्ता स्थगित करण्यात आल्याबाबत, समितीने सादर कागदपत्रांचा विचार केला. दिनांक ३०/०७/२०१६ रोजी संस्थेच्या संचालकांनी तक्रारदार यांना दिलेल्या पत्रामध्ये, संस्थेच्या नियमक मंडळ (BOG) च्या दिनांक ०७/०३/२०१६ च्या निर्णयाचा संदर्भ देत, विहित मुदतीत पीएच.डी. पूर्ण न केल्यास वेतनवाढ व महागाई भत्ता स्थगित केला जाईल, असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. त्या पत्रास तक्रारदार यांनी तत्कालीन वेळेत कोणतीही हरकत घेतल्याचे आढळून येत नाही.

तसेच दिनांक ११/०१/२०२१ च्या पत्रामध्येही संस्थेने ही बाब पुनः स्पष्ट केली आहे. त्यामध्ये जुलै २०१८ पासून वार्षिक वेतनवाढ व जुलै २०२० पासून महागाई भत्ता स्थगित राहील आणि पीएच.डी. पूर्ण झाल्यानंतर त्या कालावधीतील फरकासाठी तक्रारदार पात्र राहणार नाहीत, असे नमूद आहे. या पत्रास तक्रारदार यांनी हरकत घेतल्याचे दिसून येत नाही.

पुढे समितीच्या निदर्शनास येते की, तक्रारदार यांनी दिनांक १५/०७/२०१७ रोजी सेवा करारामध्ये संस्थेच्या नियमांचे पालन करण्यास सहमती दर्शविली होती. जाबदार संस्थेने त्यांच्या म्हणणेच्या पृष्ठार्थ एआयसीटीई पात्रता, वेतनश्रेणी, सेवा अटी स्पष्टीकरण नियम २०१६ जे ४

जानेवारी २०१६ रोजी अधिसूचित करण्यात आले असून त्यातील अनु.५३ मध्ये सात वर्षात पीएच. डी पूर्ण न केल्यास सहयोगी प्राध्यापकाच्या बाबत स्पष्टता केली आहे की, "अशा उमेदवारांनी रूजू झाल्यापासून सात वर्षाच्या आत पीएच.डी पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा पीएच.डी प्राप्त होईपर्यंत वेतनवाढ थांबवली जाईल." महाराष्ट्र शासनाने दिनांक ३ जून २०२२ च्या शासन निर्णयाव्दारे हे स्पष्टीकरण स्वीकारले आहे. शासन निर्णय परिशिष्ट २, अनु. ५ मध्ये राज्य शासनाने स्पष्ट केले आहे की, "अशा उमेदवारांनी उच्च पदावर रूजू झाल्यापासून सात वर्षाच्या आत पीएच. डी पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा पीएच.डी प्राप्त होईपर्यंत वेतनवाढ थांबवली जाईल. वार्षीक वेतनवाढ, काल्पनिक वेतनवाढी शिवाय पीएच.डी पदवी प्राप्त झाल्याच्या तारखेपासून पुन्हा सुरू होईल. तथापि, त्याने इतर सेवा अटींची पुर्तता केली असेल तर" अशी स्पष्टता केली आहे.

समितीसमोरील कागदपत्रांवरून असे स्पष्ट होते की, तक्रारदार यांना सन २०११ मध्ये सहयोगी प्राध्यापक पदोन्नती मिळाली होती. त्यामुळे त्यांना सन २०१८ पर्यंत पीएच.डी. पूर्ण करणे बंधनकारक होते. तथापि, तक्रारदार यांनी प्रत्यक्ष पीएच.डी. पदवी दिनांक ०६/०४/२०२४ रोजी प्राप्त केली. तक्रारदार यांनी विहित कालावधी व त्यानंतर सन २०२४ पर्यंत अनिवार्य अटींची पूर्तता केली नाही. परिणामी, विहित मुदत संपल्यानंतर संस्थेने केलेली महागाई भत्ता स्थगिती ही संबंधित नियमांच्या चौकटीत असल्याचे समितीस आढळते. म्हणून तक्रारदार यांची या संदर्भातील मागणी ग्राह्य धरता येत नाही.

तक्रारदार यांच्या सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकी मागणीबाबत समितीने संबंधित शासन निर्णय व एआयसीटीई अधिसूचनांचा अभ्यास केला. कोणत्याही वेतन आयोगाची अंमलबजावणी संबंधित वेळी अस्तित्वात असलेल्या पात्रता निकषांवर आधारित असते. जाबदार संस्थेने सातवा वेतन आयोग दिनांक ०१/०७/२०२३ पासून लागू केला. त्या तारखेस तक्रारदार यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केलेली नव्हती, ही बाब निर्विवाद आहे.

सुधारित वेतनश्रेणीचा लाभ संबंधित पात्रता धारण केल्याच्या दिनांकापासूनच देय होतो. आवश्यक पात्रता नसताना पूर्वलक्षी प्रभावाने लाभ मागता येत नाही. जाबदार संस्थेने तक्रारदार यांना दिनांक ०६/०४/२०२४ पासून सातवा वेतन आयोग लागू केला असून तो नियमसंगत असल्याचे समितीस आढळते. त्यामुळे या मागणीस कोणताही कायदेशीर आधार उपलब्ध होत नाही. सहयोगी प्राध्यापकपदास सातव्या वेतन आयोगात पीएच.डी पदवी अनिवार्य आहे. त्या दिनांकापूर्वी त्यांनी पीएच.डी.पूर्ण केली नव्हती.

वरील निष्कर्षांच्या आधारे समिती खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. तक्रार अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जाबदार संस्था व महाविद्यालय यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत तक्रारदार श्री. सत्यवान रामचंद्र जगताप यांना दिनांक १५/०७/२०१७ ते ३०/०६/२०२० या कालावधीतील उर्वरित वेतन तसेच त्यांना नियमानुसार लागू असलेले भत्ते अदा करावेत.

३. तक्रारदार यांनी तक्रार अर्जातील मागणी क्र.२ (सातवा वेतन आयोग थकबाकी) आणि मागणी क्र.३ (महागाई भत्ता फरक) बाबत केलेल्या मागण्या नामंजूर करण्यात येत आहेत.

दिनांक : 16 MAY 2026

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.ए.बी.साळी)

अध्यक्ष
(श्री.एस.एन.पाटील)